जिल्हा परिषद, बुलडाणा
(मगांराग्रारोहयो-म कक्ष)

## शतकोटी वृक्ष लागवड योजनाः-

- **योजनाची वैशिष्टयेः-** शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्रमांक एफडीएम-२०११/ प्र.क्र. १०४/ फ-२, दिनांक २५ ऑक्टोबर, २०११ अन्वये शतकोटी वृक्ष लागवड योजना राबविण्यात येत आहे.

वैश्विक तापमानवाढ आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी, ग्रामीण भागांना हरीत करणे तसेच ग्रामीण भागातील नागरीकांची / लोकांची लाकूडफाटा, इंधन, फळांची, औषधी वनस्पती व गुरांच्या चाऱ्यांची गरज भागविण्यासाठी व ग्रामीण भागातील लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी रोपवाटीका तयार करणे व वृक्ष लागवड करणे ही अत्यंत प्रभावी उपाययोजना आहे.

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी नवी दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय विकास परिषदेत महाराष्ट्र राज्य सन २०१२-१७ या पांचवार्षिक कालावधीत ५०० कोटी वृक्ष लागवड करणार असल्याचे जाहिर केलेले आहे. सदर उद्दिष्ट शासनाच्या विभिन्न विभाग, कृषि विभाग, वन विभाग, जलसंधारण विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, आदिवासी विकास विभाग, ग्रामीण विकास विभाग, उद्योग विभाग, जलसंपदा विभाग, सार्वजनिक बांधकाम इत्यादी विभाग आणि खाजगी उद्योजक, शैक्षणिक संस्था, सहकारी संस्था व स्वयंसेवी संस्था यांच्या सहाय्याने संयुक्तपणे राबविण्याचे ठरविले आहे.

सदर योजने अंतर्गत प्रत्येक ग्रामपंचायतीने रोपवाटीका सुरू करणे अभिप्रेत असून लोकसंख्येच्या प्रमाणात वृक्ष लागवड करावयाची आहे. सदर योजने अंतर्गत यासाठी पाहिजे तेवढा निधी उपलब्ध होवू शकत असल्यामुळे जास्तीत जास्त निधीचा उपयोग करून वृक्ष लागवड करावयाची आहे.

**ग्रामपंचायत दोन प्रकारे वनीकरणाचा कार्यक्रम राबवू शकते-**

१) ग्रामपंचायत, गायराण, गावठाण, शासकीय, निमशासकीय, सामूहिक व शैक्षणिक संस्थांच्या जमिणीवर गट लागवड करू शकते

२) ग्रामपंचायत हद्दीतील तुटक / विखुरलेली जमीन आणि रस्ता दुतर्फा वृक्ष लागवड करू शकते.

वनीकरणाद्वारे तयार होणाऱ्या मालमत्तेवर ग्रामपंचायतीचा अधिकार राहिल तसेच त्याची नोंद मगांराग्रारोहयोच्या कामाच्या मालमत्ता नोंदवहीत घ्यावयाची आहे.

**सन २०१४ च्या पावसाळयासाठी शत कोटी वृक्ष लागवड योजने अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त इष्टांकानुसार लोकसंख्येच्या प्रमाणात खालील प्रमाणे पंचायत समिती निहाय इष्टांक निश्चित करण्यात आले आहे.**

| अ.क्र. | पंचायत समिती | लोकसंख्येच्या प्रमाणात इष्टांक |
|---|---|---|
| १ | बुलडाणा | २६६६३ |
| २ | चिखली | २७४८७ |
| ३ | दे.राजा | ११७२२ |
| ४ | सिं.राजा | १९५६४ |

| अ.क्र. | पंचायत समिती | लोकसंख्येच्या प्रमाणात इष्टांक |
|---|---|---|
| ५ | मेहकर | २७१४१ |
| ६ | लोणार | १५८५२ |
| ७ | खामगांव | २७१८३ |
| ८ | शेगांव | ११९५३ |
| ९ | जळगांव जा | १५३९६ |
| १० | संग्रामपूर | १६८३१ |
| ११ | नांदूरा | १६१६५ |
| १२ | मलकापूर | १३६७० |
| १३ | मोताळा | २०३६९ |
|  | एकूण | २५०००० |